## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा/२०१२/प्र.क्र.२४/का.५,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक -: १३/०३/२०१४.

**संदर्भ** :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०९/१०/२०१२ चे आदेश.


### आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी मतदाराची ओळख पटल्यानंतर त्या मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला न मिटणारी शाई वापरुन निशाणी करण्याबाबत तसेच पुर्नमतदानाच्यावेळी मधल्या बोटाला शाई लावण्याबाबत मतदान केंद्राध्यक्षांसाठीच्या निदेश पुस्तिकेमध्ये सूचना दिल्या आहेत. काही प्रसंगी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रामध्ये लोकसभा / विधानसभेची, स्थानिक स्वराज्य संस्थेची अथवा अन्य निवडणूक नुकतीच पार पडलेली असते व मतदान केलेल्या मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर न मिटणा-या शाईची निशाणी मिटलेली नसते. अशावेळी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटाला शाई लावण्यात यावी अशा सूचना संदर्भाधिन आदेशान्वये निर्गमित केल्या आहेत.

२. भारत निवडणूक आयोगाने लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून या कार्यक्रमानुसार महाराष्ट्रात एप्रिल, २०१४ मध्ये मतदान होणार आहे. या निवडणुकांपूर्वी दिनांक २३/०३/२०१४ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुका घेण्यात येणार आहेत. लोकसभा निवडणुका या राज्यभर सर्वत्र होणार आहेत. त्यावेळी मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासंदर्भात निवडणूक यंत्रणेमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये याकरिता प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, **दिनांक २३/०३/२०१४ रोजी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटाला शाई लावण्यात यावी.**

D:\NP\Elec 2014.docx.RSK

शाई लावण्यासंदर्भातील सूचना पुढील छायाचित्राद्वारे स्पष्ट करण्यात येत आहेत. त्यानुसार मतदाराच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला मार्कर पेनद्वारे शाई लावण्यात यावी.



३. <u>सदरहू आदेश मार्च, २०१४ मध्ये होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपुरतेच लागू राहतील.</u>

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
संबंधित महानगरपालिका आयुक्त
संबंधित जिल्हाधिकारी
संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषदा
संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

D:\NP\Elec 2014.docx.RSK

अ.शा.पत्र क्रमांक- रानिआ/ मनपा/२०११/प्र.क्र. १०/का.५

निवडणूक प्राथम्य

**ध. मा. कानेड**
अवर सचिव

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २८/११/२०११

विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणाऱ्या शाईच्या बाटलीऐवजी मार्कर पेनच्या वापराबाबत..

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१९/११/२०११ चे पत्र.

आदरणीय महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांमध्ये अ.क्र. २ येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला मार्कर पेनद्वारे शाई लावतांना मार्कर पेन दाबून वापरावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या संदर्भात अजून अशा सूचना देण्यात येत आहेत कीं, शाई मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल अशाप्रकारे लावण्यात यावी. याकरिता मतदाराच्या बोटावर मार्कर पेन किमान ३ ते ४ वेळा घासून शाई लावण्यात यावी. याबाबत लेखी सूचना सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना स्पष्टपणे द्याव्यात तसेच प्रशिक्षणाच्यावेळी याबाबत प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात यावे.

स्नेहादराने,

आपला

(ध. मा. कानेड)

जिल्हाधिकारी, सर्व ( मुंबई शहर, उपनगर व ठाणे वगळून)

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

क्र.रानिआ /मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९.११.२०११.

प्रति,

१. जिल्हाधिकारी,(सर्व),
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

**विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.**

महोदय,

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये मतदाराच्या हाताच्या बोटाला लावण्यात येणा-या शाईऐवजी आता मार्करपेनचा वापर करावयाचा असून सदरहू मार्करपेन वापरताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदाराच्या हाताच्या बोटाला (पृ.क्र.२/प.वि.वरील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे) मार्करपेनने निशाणी करण्यात यावी. मतदाराच्या बोटाला मार्करपेनने निशाणी केल्यानंतर, मतदाराने मतदान केल्यानंतर त्याच्या बोटास केलेली निशाणी तशीच आहे याची खात्री मतदान अधिका-याने, मतदार मतदान केंद्र सोडण्यापूर्वी करावी.

२. मार्करपेन दाबून वापरावा.

३. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा त्यास घट्ट टोपण लावून ठेवावे.

४. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा आडवा (**Horizontal**) ठेवण्यात यावा.

२/-

C:\Documents and Settings\kapileshwar\Desktop\15.11.11\EVM rec .doc

निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणुकीचे प्रशिक्षण देताना मार्कर पेनचा वापर कसा करावा याबाबत पूर्वपृष्ठावर नमूद केल्यानुसार स्पष्ट सूचना द्याव्यात. (सूचना मार्कर पेनवरही दर्शविण्यात आल्या आहेत.)

आदेशानुसार,


आपला

(स्वाक्षरी)

(ध.मा.कानेड)

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग




C:\Documents and Settings\kapileshwar\Desktop\15.11.11\EVM rec..doc